REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# नागपूर जिल्हयातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व उत्पादन विषयक समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन



डॉ. गणेश एस. मायवाडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,
संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा,
जिल्हा–नागपूर.

## सारांश

प्रस्तुत विषयाचे भौगोलिक क्षेत्र संपूर्ण नागपूर जिल्हयातील १४ तालूके आहे. या तालुक्यांमध्ये राहणा–या धान उत्पादन करणा–या शेतक–यांचा अभ्यास केला आहे. शेतक–यांचा आर्थिक दृष्टया विकास व्हावा हाच दृष्टीकोन प्रस्तुत विषयाचे आहे.

तसेच अध्ययन विषयाच्या अभ्यासासाठी नागपूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील ०५ गावांची व प्रत्येक गावातील ०५ शेतक–यांची निवड यादृश्चिक नमुना निवड पद्धतीने केली आहे. तसेच शेतक–याच्या मुलाखती घेण्यात आल्या आहे. नागपूर जिल्हयातील ७०० शेतक–यांची मुलाखत नमुना निवड पावतीच्या आधारे घेण्यात आले आहे.

## प्रस्तावना

राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण असते. वाढत्या आर्थिक विकासाबरोबर शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व कमी होत जाते हे जरी खरे असले तरी ही अवस्था साध्य करण्यासाठी शेतीच्या क्षेत्राची मदत मोलाची ठरते. जपानसारख्या वेगाने विकसित झालेल्या देशात सुद्धा शेतीने विकास–प्रक्रियेला हातभार लावला आहे. देश विकसित झाला तरी वाढत्या लोकसंख्येची, अन्नधान्याची आणि विविध उपयोगांची कच्चा मालाची गरज हेच क्षेत्र पूर्ण करते. विकसनशील अर्थव्यवस्थेत तर राष्ट्रीय उत्पन्न, निर्यात, अन्नधान्य आणि कच्च्या

मालाचा पुरवठा, रोजगार इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये शेती-क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते.

राजकारणापासून तर अर्थकारणापर्यंत सर्व क्षेत्रात कृषि उत्पादनाचे अत्यंत महत्व आहे. नागपूर जिल्हयातील शेतकरी गेल्या कित्तेक वर्षापासून धान, ज्वारी, गहू, तूर, ऊस व जवस इ. पिकांच्या उत्पादनाबरोबरच सोयाबिन पिकाला सुद्धा अधिक महत्व देतांना दिसून येते. कारण या पिकासाठी आवश्यक असणारे वातावरण तसेच या पिकाला लागणारे बी–बियाणे व इतर सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे शेतक–यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून येण्यास मदत होते. परंतु या पिकांसाठी आवश्यक असणारे पूरेशी बाजारपेठ उपलब्ध नसल्यामुळे तसेच दलाल व अडते यांच्याकडून शेतक–यांची पिळवणूक व शोषण थांबविण्यासाठी तसेच बाजारपेठेतील सोयाबिनच्या किंमतीमध्ये होणारा चढउतार यासारख्या अनेक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी संशोधनकर्त्याने प्रस्तुत विषय निवडला आहे.

मनुष्य हा समाजशिल प्राणी आहे. तो समाजात राहू इच्छितो. एकटा राहून तो जीवन कंठीत करू शकत नाही. समाजाने आपली नोंद घ्यावी, सहकार्य करावे, मान द्यावा, आदर करावा असे प्रत्येक मनुष्याला वाटत असते. यातुनच सहकार्य, मैत्री, प्रेम, असहकार, इ. प्रकार घडत असतात. मनुष्य समाजशिल असला तरी त्याच्या स्वभावातील, कृतीतील स्वाभिमान, अहंकार व मी पणा त्याला इतरांपासून दूर घेऊन जातो त्यामूळे तो सामाजिक असुनही सहकारी बनू शकला नाही. तो इतरांवर अधिकार गाजवू इच्छीतो. इतराकडून अपेक्षा करतो. पण इतरांचे अधिकार व इतरांच्या अपेक्षा मात्र जाणून घेत नाही. त्याची त्याला काळजी नसल्यामुळेच समाज एकत्रित दिसून येत असला तरी त्यात किती दुरावा, असहकार आहे हे सामाजिक अध्ययनाततून ध्यानात येऊ शकते. हे जाणून घेण्याची उत्सूकता निर्माण होणे अध्ययन करताना सहाजिक आहे. याच उत्सुकतेतून व समाजाला काही सत्य निदर्शनास आणून देण्याच्या उद्देशाने **नागपूर जिल्हयातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व उत्पादन विषयक समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन** करण्यात आले ते पुढीलप्रमाणे विश्लेषित करण्यात आले आहे.

### सारणी क्र. १ धान उत्पादक शेतकऱ्यांना धान पिका मुळे प्राप्त झालेले उत्पन्न दर्शविणारी सारणी

| शेतीचे क्षेत्रफळ | शेतकऱ्यांची संख्या | मध्यमान व प्रमाप विचलन (रूपये प्रती एकर) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २००६ | २००८ | २०१० | २०१२ | २०१४ |
| ५ एकर पेक्षा कमी | ८७ | ३१२४ ± ४५६ | ३२१७ ± ३४८ | ३५५२ ± ४४८ | ३९४८ ± ५७२ | ४२०० ± ६१८ |
| ५ ते १० एकर | ३१४ | ३२१७ ±३५३ | ३४०२ ±३४७ | ३६१२±५०१ | ४१०७±३१९ | ४३५६ ±२१८ |
| १० ते १५ एकर | २१५ | ३०९८ ±२१३ | ३३२४±३१२ | ३५१७±६०९ | ४००६±७४१ | ४२९४ ±५३२ |
| १५ एकर पेक्षा अधिक | ८४ | ३०७२±१८७ | ३४३०±२५४ | ३६४२±३२८ | ४११७±६०२ | ४२८९ ±३२५ |

**आधार :– प्रश्नावलीचे वर्गीकरण**

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, शेतीचे क्षेत्रफळ ५ एकर पेक्षा कमी असलेल्या शेतकऱ्यांना धान लागवडीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वर्ष २००४ ते २०१४ दरम्यान साधारण वाढझाली. शेतीचे क्षेत्रफळ ५ ते १० एकर असलेल्या शेतकऱ्यांना धान लागवडी पासून मिळणाऱ्या उत्पन्नात वर्ष २००४ ते २०१४ दरम्यान साधारण वाढझाली आहे. शेतीचे क्षेत्रफळ १० ते १५ एकर असलेल्या शेतकऱ्यांना धान लागवडी पासून मिळणाऱ्या उत्पन्नात वर्ष २००४ ते २०१४ दरम्यान साधारण वाढझाली आहे. तसेच शेतीचे क्षेत्रफळ १५ एकर पेक्षा अधिक असलेल्या शेतकऱ्यांना धान लागवडीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वर्ष २००४ ते २०१४ दरम्यान वाढझाली. आहे.

या वरून हे स्पष्ट होते की, नागपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना धान लागवडीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वर्ष २००४ ते २०१४ दरम्यान साधारण वाढझाली आहे. तथापी या कालावधीतील धान लागवड क्षेत्राच्या तुलनेत उत्पन्नात वाढझाली नाही.

### सारणी क्र. २: धान उत्पादक शेतकऱ्यांद्वारे शेतीव्यतिरीक्त इतर शेतीपूरक व्यवसाय करण्यासंबंधी प्रतिक्रीया दर्शविणारी सारणी

| शेती व्यतिरीक्त इतर व्यवसाय | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| उत्तरदाते | ३८९ | ३११ | ७०० |
| प्रतिशत प्रमाण | ५५.६% | ४४.४% | १००% |

**आधार :– प्रश्नावलीचे वर्गीकरण**

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, ७०० उत्तरदात्यांपैकी ३८९ (५५.६%) उत्तरदाते शेती व्यतिरीक्त इतर शेतीपूरक व्यवसाय करीत असून, ३११ (४४.४%) उत्तरदाते शेती व्यतिरीक्त इतर शेतीपूरक व्यवसाय करीत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीतुन दिसून आले.

यावरुन स्पष्ट होते की, नागपूर जिल्ह्यातील बहुसंख्य धान उत्पादक शेती व्यतिरीक्त इतर शेतीपूरक व्यवसाय करतात.

**सारणी क्र. ३ः धान उत्पादक शेतकऱ्यांना शेतीव्यतिरीक्त इतर शेतीपूरक व्यवसाय व्यवसायाद्धरे मिळणारे मासिक व वार्षीक उत्पन्न दर्शविणारी सारणी**

| शेतीपूरक व्यवसायातून मिळणारे उत्पन्न | मध्यमान (रू) | प्रमाप विचलन | किमान (रू.) | कमाल (रू.) |
|---|---|---|---|---|
| मासिक | ३,००० | ±७८० | १२०० | ४८०० |
| वार्षीक | ३२,००० | ± २,३०० | २४,००० | ३८,८०० |

**आधार :- प्रश्नावलीचे वर्गीकरण**

वरील सारणी वरुन असे निदर्शनास येते की, शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या एकूण ३८९ धान उत्पादक शेतकऱ्यांना या व्यवसायातून सरासरी मासिक रू.३०००±७८० व सरासरी वार्षीक रू.३२,०००±२,३०० एवढे उत्पन्न प्राप्त होत असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले.

## निष्कर्ष

नागपूर जिल्हयातील धान उत्पादक शेतक-यांच्या अभ्यास करतांना असे आढळून आले की उत्तरदात्यांची स्थिती समाधानकारक असली तरी फारशी चांगली नाही. त्यांच्या राहणीमानाचा दर्जा पाहिजे तितका उंचावलेला नाही त्यांमुळे उत्तरदात्याच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम सामाजिक जीवनावर विशेष झाला असे आढळून येते.

## संदर्भ ग्रंथसुची

१. डॉ. आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
२. डॉ. आगलावे प्रदिप, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. डॉ. भांडारकर- रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
४. डॉ. कविमंडन विजय- कृषी अर्थशास्त्र
५. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोणी विवेक- सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३

६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन- नागपूर
७. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, नागपूर
८. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख नागपूर
९. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय नागपूर
१०.जिल्हा ऋतु व पिके अहवाल-वार्षिक अहवाल २००२ते २०११
११.पशुगणना-२००१ आणि २०११
१२.प्रत्यक्ष शेतक-याची मुलाखत, निरीक्षण व चर्चा